ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक २२ • मंगळवार दि.१३ ऑक्टोबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## यूपीआय शुल्काला तूर्तास ब्रेक
## ग्राहक व व्यापाऱ्यांना तुर्त दिलासा




नवी दिल्ली:डिजिटल व्यवहारांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या यूपीआय व्यवहारांवरील व्यापारी सवलत दर (एमडीआर) शुल्काच्या प्रस्तावित अंमलबजावणीला तूर्तास स्थगिती देण्यात आल्याचे वृत्त आहे. १५ ऑक्टोबरपासून शुल्क लागू होणार असल्याची चर्चा असताना, आता दिवाळीनंतरच याबाबत पुढील निर्णय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सणासुदीच्या काळात व्यापाऱ्यांवर अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता असताना हा निर्णय पुढे ढकलल्याने व्यापारी वर्गाला तूर्तास दिलासा मिळाला आहे.

यूपीआयच्या माध्यमातून होणाऱ्या व्यापारी व्यवहारांवर शुल्क आकारण्याच्या प्रस्तावामुळे व्यापाऱ्यांमध्ये नाराजी आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. सध्या ग्राहकांकडून वस्तूंची खरेदी करताना रोख रकमेऐवजी यूपीआयद्वारे पैसे देण्याचे प्रमाण वाढले आहे. किराणा दुकाने, हॉटेल्स, लहान व्यावसायिक प्रतिष्ठाने तसेच मोठ्या व्यापारी आस्थापनांमध्येही डिजिटल व्यवहारांचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. अशा परिस्थितीत यूपीआय व्यवहारांवर शुल्क लागू झाल्यास व्यापाऱ्यांच्या खर्चात वाढ होण्याची चिंता व्यक्त केली जात होती.प्रस्तावित शुल्क सर्व यूपीआय व्यवहारांवर लागू होणार नसून, निवडक व्यापारी व्यवहारांपुरतेच मर्यादित राहण्याची शक्यता आहे. दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या काही व्यापारी व्यवहारांवर ०.४ टक्के शुल्क आकारण्याबाबत चर्चा झाल्याचे वृत्त आहे. पान ४ वर

## नांदेडसह राज्याला 'ऑक्टोबर हिट'चा चटका
### उन्हाच्या काहिलीने होरपळ,मालेगाव सर्वाधिक उष्ण तर नांदेड ३६ अंशांवर

मुंबई/प्रतिनिधी-परतीच्या पावसाची माघार आणि कोरड्या हवामानामुळे मराठवाड्यासह संपुर्ण राज्याला ऑक्टोबर हीटचा चटका जोरदार बसू लागला आहे. नांदेडमध्ये कमाल तापमान ३६.१ अंश सेल्सिअसवर पोहोचल्याने उन्हाची तीव्रता जाणवू लागली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्येही पारा ३६.५ अंशांवर नोंदविण्यात आला. राज्याच्या अनेक भागांत तापमान ३८ अंशांच्या आसपास पोहोचल्याने उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत.

राज्यात मान्सूनच्या माघारीनंतर पावसाचा प्रभाव कमी होत असून, कोरड्या वातावरणामुळे दिवसाच्या तापमानात वाढ होत आहे. दुपारच्या वेळी उन्हाचा चटका अधिक तीव्र जाणवत असून, नागरिकांना उष्णतेचा सामना करावा लागत आहे. उत्तर महाराष्ट्रातील मालेगाव येथे राज्यातील सर्वाधिक ३८.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. रत्नागिरीत ३८.३, अकोल्यात ३८.१, तर मुंबईतील सांताक्रूझ आणि अमरावती येथे ३८ अंश तापमान नोंदविण्यात आले. सोलापूर आणि यवतमाळ येथे ३७.६ अंश, जळगावमध्ये ३७.१ अंश, तर नांदेडमध्ये ३६.१ अंश तापमान राहिले. मराठवाड्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडताना काळजी घ्यावी, पुरेसे पाणी प्यावे आणि उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## लेंडी धरणातील अवैध वाळू साठा; ६९.६९ लाखांचा दंड
### कंत्राटदाराला काळ्या यादीत टाका

मुखेड/प्रतिनिधी-आंतरराज्यीय लेंडी धरण प्रकल्पांतर्गत मारजवाडी येथील जलाशयाच्या शासकीय संपादित क्षेत्रात विनापरवाना काळ्या वाळूचा साठा केल्याप्रकरणी महसूल प्रशासनाने कारवाई केली आहे. कँत्राटदार मुळे ब्रदर्स यांना ६९ लाख ६९ हजार रुपयांच्या दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांच्या आदेशानुसार तहसीलदार अभयराज नंजुडे यांनी ही कारवाई केली.

मारजवाडी येथील मुळे ब्रदर्स आणि हरी असोसिएट्स यांच्या कॅम्प परिसरात काम पूर्ण झाल्यानंतर भविष्यातील कामांसाठी मोठ्या प्रमाणावर वाळू साठवून ठेवल्याचे निदर्शनास आले. या कथित अवैध वाळूसाठ्याबाबत वृत्तपत्रांतून बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर महसूल प्रशासनाने प्रकरणाची दखल घेतली.दरम्यान, लेंडी प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंत्यांनी आपल्या कार्यालयामार्फत या ठिकाणी कोणताही वाळूसाठा करण्यात आला नसल्याचे पत्र उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले होते. त्यानंतर मुक्रमाबादचे मंडळ अधिकारी आणि मारजवाडीचे तलाठी यांनी संयुक्तपणे पंचनामा केला. त्याचा अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आला. या अहवालाच्या आधारे तहसीलदारांनी संबंधित कँत्राटदाराला दंडाची नोटीस बजावली आहे.शासकीय क्षेत्रात विनापरवाना गौण खनिजाचा साठा केल्याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित कँत्राटदारावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. शासनाच्या महसुलाचे नुकसान झाले असल्यास त्याची वसुली करून कँत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.तहसीलदार अभयराज नंजुडे यांनी सांगितले की, संबंधित कँत्राटदाराकडून नोटिशीबाबत खुलासा सादर झाल्यानंतर त्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

## निवडणूक आयोगाविरोधात संघर्ष तीव्र;विरोधकांवर ४ गुन्हे
### व्यापक एकजुटीसाठी राहुल गांधींची विरोधकांना चहापानाची हाक

नवी दिल्ली: मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्द्यावरून राजधानी दिल्लीत राजकीय संघर्ष तीव्र झाला असून, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरलेल्या विरोधकांच्या आंदोलनाप्रकरणी दिल्ली पोलिसांनी चार गुन्हे दाखल केले आहेत. दुसरीकडे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी इंडिया आघाडीतील नेते, विरोधी पक्षांचे खासदार, विद्यार्थी संघटना आणि नागरी समाजातील प्रतिनिधींना मंगळवारी दुपारी चार वाजता आपल्या निवासस्थानी चहापानासाठी आमंत्रित केले आहे. सर्व आंदोलने एकच आहेत, असा संदेश देत राहुल गांधी यांनी विरोधकांच्या व्यापक एकजुटीचे संकेत दिल्याने राजधानीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

एसआयआर प्रक्रियेत मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जात असल्याचा आणि निवडणूक प्रक्रियेत अनियमितता होत असल्याचा आरोप करीत विरोधी पक्षांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. याच मुद्द्यावरून सोमवारी बाराखंबा रोडपासून सर्वोच्च न्यायालयापर्यंत मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांच्यासह ११ विरोधी पक्षांच्या नेत्यांनी सहभाग घेतला. या आंदोलनानंतर दिल्ली पोलिसांनी कनॉट प्लेस, बाराखंबा, टिळक मार्ग आणि मंदिर मार्ग पोलीस ठाण्यांमध्ये चार स्वतंत्र एफआयआर नोंदविले आहेत.दरम्यान, राहुल गांधी यांनी समाज माध्यमांवर पोस्ट करीत इंडिया आघाडीतील नेते, विरोधी पक्षांचे खासदार, विद्यार्थी संघटना आणि नागरी समाजातील सहकाऱ्यांना चहापानाचे निमंत्रण दिले आहे. लोकशाहीच्या रक्षणासाठी सुरू असलेल्या जनआंदोलनात सर्वजण एकजूट असून, हा लढा यापुढेही सुरूच राहील, असे त्यांनी म्हटले आहे. चहापानानंतर सर्व नेते माध्यमांसमोर आपली भूमिका मांडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्या ऑल प्रोटेस्ट्स आर वन या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.या पार्श्वभूमीवर दिल्लीत स्वतंत्रपणे आंदोलन करणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या (सीजेपी) भूमिकेकडेही लक्ष लागले आहे. सीजेपीकडून मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन सुरू असले, तरी या संघटनेच्या नेतृत्वाची राहुल गांधी यांच्याशी अद्याप भेट झालेली नाही. सोमवारी सर्वोच्च न्यायालयाकडे निघालेल्या मोर्चात सीजेपी आणि आम आदमी पक्ष सहभागी झाले नव्हते. त्यामुळे राहुल गांधी यांनी बोलावलेल्या चर्चेत सीजेपीचे अभिजित दीपके सहभागी होणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दिल्लीत रस्त्यावर उतरून आंदोलन करणाऱ्या नेहा बोरा यांनी मात्र सर्वोच्च न्यायालयावरील मोर्चात सहभाग घेतला होता. एसआयआर विरोधातील आंदोलनाला न्यायालयीन लढ्याचीही जोड देण्यात आली आहे. राहुल गांधी, अखिलेश यादव, तेजस्वी यादव यांच्यासह विरोधी पक्षांच्या नेत्यांनी १२ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. मतदार यादीतील कथित अनियमिततांची स्वतंत्र चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. या समितीत तांत्रिक तज्ज्ञ आणि प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश असावा, तसेच मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नावांचे आणि एसआयआर प्रक्रियेत करण्यात आलेल्या बदलांचे निर्धारित कालावधीत स्वतंत्र लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.मात्र, या याचिकेत सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने सुमारे १४ त्रुटी निदर्शनास आणल्याचे पीटीआयने वृत्त दिले आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या ओळखपत्राची स्पष्ट प्रत सादर करण्यास सांगण्यात आले असून, नऊ याचिका-कर्त्यांची लेखी संमती पान ४ वर

## विवाह सोहळ्यांतील अनावश्यक खर्च टाळून गरजूंना मदत करा
### दुष्काळ निवारणासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा-जिल्हाधिकारी

माहूर/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, आगामी काळात दुष्काळाच्या संकटाचा सामना करण्यासाठी नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा. तसेच जलतारा यांसारखे जलसंधारणाचे उपक्रम राबवून पाणी बचतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले.

आगामी काळात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळे होणार आहेत. या पार्श्वभूमीवर सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन अधिकाधिक व्हावे, यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. नागरिकांनी विवाह समारंभांमध्ये अनावश्यक खर्च टाळून त्यातून वाचणारा पैसा गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी तसेच मुख्यमंत्री सहायता निधीसाठी द्यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी कर्डीले यांनी केले.माहूर येथील श्री रेणुका देवी संस्थान सामाजिक उत्तरदायित्व जपत विविध सामाजिक उपक्रमांमध्ये योगदान देत आहे. यापूर्वी संस्थानच्या वतीने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी एक कोटी अकरा लाख रुपयांची देणगी देण्यात आली होती. सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकरी आणि गरजू नागरिकांना दिलासा देण्यासाठी संस्थानच्या माध्यमातून कोणत्या स्वरूपात मदत करता येईल, याबाबत विचारविनिमय सुरू असल्याचे जिल्हाधिकारी यांनी नमूद केले.दुष्काळाच्या संभाव्य संकटावर मात करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. पाण्याची बचत, जलसंधारण, सामूहिक विवाह सोहळ्यांना प्रोत्साहन आणि गरजूंना आर्थिक मदत अशा उपक्रमांतून समाजाने एकत्रितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी केले.

## वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त १५ रोजी भव्य कार्यक्रम
### अनंतराव नागापूरकर राज्यस्तरीय पत्रकारिता संजीव कुलकर्णी,ज्ञानगंगा माधवराव कोकुरले तर विक्रेता पुरस्कार किशनसिंह चव्हाण यांना जाहीर

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाच्या २७ व्या वर्धापनदिनानिमित्त आणि वृत्तपत्र विक्रेता दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा मेळावा व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांसह उत्कृष्ट वृत्तपत्र विक्रेत्यांचा सन्मान करण्यात येणार असून, गुणवंत पाल्यांचाही गौरव केला जाणार आहे.

या सोहळ्याचे उद्घाटन आ.बालाजीराव कल्याणकर यांच्या हस्ते होणार आहे. आ.अमरभाऊ राजुरकर आणि डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे कार्याध्यक्ष बालाजी पवार राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे, पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे, आयटकचे नेते कॉ. प्रदीप नागापूरकर आणि गोवर्धन बियाणी उपस्थित राहणार आहेत.

यंदाच्या राज्यस्तरीय पुरस्कारांमध्ये ज्येष्ठ पत्रकार संजीवभाऊ कुलकर्णी यांना कॉ. अनंतराव नागापूरकर राज्यस्तरीय उत्कृष्ट







पत्रकारिता पुरस्कार, नायगाव येथे माधवराव कोकुरले यांना ज्ञानगंगा विशेष पत्रकारिता पुरस्कार, तर भोकर येथील ज्येष्ठ वृत्तपत्र विक्रेते किशनसिंह चव्हाण यांना उत्कृष्ट वृत्तपत्र विक्रेता राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पत्रकारिता आणि वृत्तपत्र वितरण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन या पुरस्कारांसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. याशिवाय गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

**रॅलीनंतर पुरस्कार वितरण सोहळा**

मेळाव्यानिमित्त गुरुवार, दि.१५ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता शिवाजीनगर येथील वृत्तपत्र वितरण सेंटरवरून रॅली काढण्यात येणार आहे. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतींना अभिवादन करून ही रॅली कार्यक्रमस्थळी पोहोचणार आहे. त्यानंतर सायंकाळी ५ वाजता हॉटेल विसावा येथे जिल्हा मेळावा आणि राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

वृत्तपत्र विक्रेते हे वृत्तपत्र वितरण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. दररोज पहाटेपासून घरोघरी वृत्तपत्र पोहोचवून समाजापर्यंत ज्ञान, माहिती आणि विचार पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण काम ते करतात. ऊन, वारा, पाऊस यांची तमा न बाळगता आपले कर्तव्य बजावणाऱ्या या ज्ञानदूतांच्या कार्याचा सन्मान व्हावा आणि वृत्तपत्र विक्रेता बांधवांमध्ये एकजूट व संघटनभावना वाढावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेने भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्याची परंपरा सुरू केली आहे. याच अनुषंगाने दरवर्षी मेळाव्याचे आयोजन करण्यात करण्यात आले आहे.

या जिल्हा मेळाव्यास आणि रॅलीस जिल्ह्यातील सर्व वृत्तपत्र विक्रेता बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन नांदेड जिल्हा वृत्तपत्र वितरक विकास मंडळाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत घाटोळ, उपाध्यक्ष सतीश कदम, सचिव गणेश वडगावकर, कोषाध्यक्ष बाबू जल्देवार, सहसचिव भागवत गायकवाड, सरदार सिंह चौहान, अनुप ठाकूर, दीपक नरवाडे, दिपक तिडके, बालाजी चंदेल, सत्यनारायण देवरकोंडा आणि अनंत संगेवार, बालाजी सुताडे यांनी केले आहे.

# लोकशाहीत प्रश्न विचारणे हा दबाव नव्हे

**भारतीय लोकशाहीचा आत्मा मतपेटीत आहे आणि मतपेटीची विश्वासार्हता निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर अवलंबून आहे. मात्र, मतदारांच्या हक्कांबाबतच प्रश्नचिन्ह निर्माण होत असेल, तर लोकशाहीच्या रक्षणासाठी आवाज उठविणे ही विरोधकांची जबाबदारी ठरते. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात इंडिया आघाडीने सुरू केलेले आंदोलन दिवसेंदिवस आक्रमक होत आहे. सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढण्याच्या कृतीवरून सत्ताधारी पक्षाने विरोधकांवर घटनात्मक संस्थांवर दबाव आणण्याचा आरोप केला आहे. या आरोपामध्ये काही अंशी तथ्य असण्याची शक्यता नाकारता येत नाही. परंतु, या संपूर्ण प्रकरणाकडे केवळ राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या चष्म्यातून पाहणे म्हणजे मूळ प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यासारखे आहे. निवडणूक आयोग, न्यायपालिका आणि अन्य घटनात्मक संस्था या भारतीय लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. या संस्थांची स्वायत्तता अबाधित राहिली पाहिजे. त्यांच्यावर राजकीय दबाव आणण्याचा कोणताही प्रयत्न समर्थनीय ठरू शकत नाही. त्याचवेळी या संस्थांच्या कामकाजावर प्रश्न उपस्थित करणे, त्यांच्या निर्णयांविषयी असमाधान व्यक्त करणे किंवा त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकतेची मागणी करणे, हा लोकशाहीतील नागरिकांचा आणि राजकीय पक्षांचा अधिकार आहे. संस्थांचा सन्मान राखणे म्हणजे त्यांच्या प्रत्येक कृतीवर प्रश्न न विचारता मौन बाळगणे नव्हे. इंडिया आघाडीच्या आंदोलनामागील राजकीय हेतू, आंदोलनाची पद्धत आणि त्यातून निर्माण होणारा संस्थात्मक दबाव यांची चिकित्सा अवश्य झाली पाहिजे. मात्र, त्याचवेळी मतदार पुनर्परीक्षणाच्या प्रक्रियेमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या मतदानाच्या हक्कांवर काय परिणाम होतो आहे, याचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले गेले, तर त्याचा परिणाम केवळ एका नोंदीपुरता मर्यादित राहत नाही. त्याला लोकशाहीच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याच्या अधिकारावरच गदा येऊ शकते. न्यायव्यवस्थेच्या कामकाजाविषयी जनसामान्यांच्या मनात निर्माण होणारा प्रश्न अधिक गंभीर आहे. काही तातडीच्या आणि असाधारण प्रकरणांमध्ये न्यायालये रात्री उशिरा, अगदी मध्यरात्रीही सुनावणी घेतात. न्याय देण्यासाठी असलेली ही तत्परता निश्चितच स्वागतार्ह आहे. एखाद्या व्यक्तीचे स्वातंत्र्य, घटनात्मक अधिकार किंवा तातडीचा न्यायाचा प्रश्न असेल, तर वेळेची मर्यादा ओलांडून न्यायालयाने हस्तक्षेप करणे हे न्यायव्यवस्थेच्या जिवंतपणाचे लक्षण आहे. मग मतदार पुनर्परीक्षणासारख्या व्यापक सार्वजनिक महत्त्वाच्या विषयावर सर्वसामान्य नागरिकांच्या मनातील शंका दूर करण्यासाठी तितकीच तत्परता का दिसू नये? मतदार यादीतील नाव, नागरिकाची पात्रता आणि मतदानाचा अधिकार हे केवळ प्रशासकीय प्रक्रियेचे विषय नाहीत. ते नागरिकाच्या लोकशाहीतील अस्तित्वाशी जोडलेले आहेत. मतदार यादीतून एखादे नाव चुकीने वगळले गेले, तर नंतर न्याय मिळाला तरी संबंधित निवडणुकीत मतदान करण्याची संधी निघून गेलेली असू शकते. म्हणूनच अशा प्रकरणांमध्ये वेळेवर सुनावणी आणि स्पष्ट निर्देश यांना विशेष महत्त्व आहे.तथापि, सर्वोच्च न्यायालयाला या विषयात वेळच दिलेला नाही किंवा न्यायालयाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे, असा निष्कर्ष काढण्यापूर्वी प्रकरणाची सद्यस्थिती, प्रलंबित याचिका आणि न्यायालयीन कामकाजातील अडचणी समजून घेणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रियेवर टीका करताना वस्तुस्थितीचा आधार सोडता कामा नये. परंतु, या प्रक्रियेमुळे प्रभावित होणाऱ्या नागरिकांच्या चिंतांकडेही दुर्लक्ष होता कामा नये.सत्ताधाऱ्यांनी विरोधकांच्या आंदोलनावर टीका करताना एक प्रश्न स्वतःलाही विचारला पाहिजे. मतदारांच्या मनात निवडणूक प्रक्रियेविषयी शंका निर्माण होत असेल, तर त्या शंकांचे निरसन करण्यासाठी सरकार आणि निवडणूक आयोगाने कोणती ठोस पावले उचलली? मतदार पुनर्परीक्षणाची प्रक्रिया पारदर्शक, न्याय्य आणि सर्वसमावेशक असल्याचा विश्वास नागरिकांना देण्याची जबाबदारी कोणाची? केवळ विरोधकांनी आंदोलन केले म्हणून त्यांना लोकशाहीविरोधी ठरविणे हा समस्येचा उपाय होऊ शकत नाही. दुसरीकडे, इंडिया आघाडीनेही आंदोलन करताना न्यायपालिकेच्या स्वायत्ततेचा आणि न्यायालयीन प्रक्रियेच्या प्रतिष्ठेचा आदर राखला पाहिजे. न्यायालयावर मोर्चा काढणे किंवा आक्रमक आंदोलन करणे यामुळे न्यायदानावर दबाव निर्माण होत असल्याचा आभास होऊ शकतो. त्यामुळे आंदोलनाची दिशा व्यक्तीविरोधी संघर्षापुरती मर्यादित न ठेवता मतदारांच्या हक्कांचे संरक्षण, पारदर्शक निवडणूक प्रक्रिया आणि उत्तरदायित्व या मुद्द्यांवर केंद्रित असली पाहिजे. लोकशाहीत सत्ता बदलत असते, राजकीय पक्षांचे स्थान बदलत असते; परंतु नागरिकांचे अधिकार कायम राहिले पाहिजेत. घटनात्मक संस्थांची प्रतिष्ठा टिकविणे जितके आवश्यक आहे, तितकेच त्या संस्थांवरील जनतेचा विश्वास टिकविणेही महत्त्वाचे आहे. हा विश्वास केवळ टीका करणाऱ्यांना दोष देऊन निर्माण होत नाही; तो पारदर्शकता, तत्परता आणि न्याय्य कार्यपद्धतीतून निर्माण होतो. आज खरी गरज आहे ती आरोप-प्रत्यारोपांच्या राजकारणापलीकडे जाण्याची. विरोधकांनी संस्थांवर दबाव आणू नये आणि संस्थांनीही जनतेच्या प्रश्नांबाबत उदासीन असल्याचा आभास निर्माण होऊ देऊ नये. मतदारांच्या अधिकारांचा प्रश्न हा कोणत्याही एका पक्षाचा राजकीय अजेंडा नसून भारतीय लोकशाहीच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. घटनात्मक संस्थांची प्रतिष्ठा जपलीच पाहिजे; पण त्या प्रतिष्ठेच्या नावाखाली सामान्य मतदारांच्या प्रश्नांना प्रतीक्षेत ठेवता कामा नये. कारण न्याय मिळण्यास झालेला विलंब आणि मतदानाचा हक्क गमावण्याची वेळ, या दोन्हींची किंमत लोकशाहीला मोजावी लागते. संस्थांचा सन्मान आणि नागरिकांचे अधिकार यांच्यात संघर्ष निर्माण होणे, हीच लोकशाहीची खरी शोकांतिका आहे!**

# नवरात्रोत्सवाचा संदेश



नवरात्र दरवर्षी येतो. नवदिवस रेलचेल असते. नव दिवसानंतर तो निघून जातो. येतो तसा. परंतु तो का येतो? हे मात्र कोणीही जाणत नाही.नवरात्री उत्सवाची एक कथा प्रचलीत आहे. म्हटलं जातं की नऊ दिवस एक देवी वेगवेगळं रुप घेवून महिषासूर नावाच्या दैत्याशी लढली. ती नऊ दिवस व नऊ रात्र लढली. म्हणूनच या उत्सवाला नवरात्र उत्सव म्हणतात व या उत्सवापासून आपण बोध न घेता फक्त हा उत्सव साजरा करतांना केवळ या उत्सवाकडे एक मनोरंजन म्हणून आपण पाहतो व आपलं मनोरंजन करुन घेत हा उत्सव साजरा करतो. ज्यात सजून धजून पाषाणरुपातील देवीचं दर्शन घेण्यासाठी मंदिरात जातो. कोणी सजून धजून गरबा खेळायला जातात आणि ऐन परीक्षेच्या वेळेस असे गरबा खेळायला जावून आपल्या आयुष्याचं वाटोळं करुन घेतात.

महिषासूर...महिषासूराला त्या काळात देवीनं दहाव्या दिवशी मारलं, वेगवेगळी रुपं घेवून. परंतु खरंच महिषासूर मरण पावला का? त्याचा जन्म पुनर्जन्म झाला नसेल काय? त्याच्या रक्तातून महिषासूराची दंपत्ती तयार झाली नसेल काय? होय. महिषासूर मरण पावला. नवदुर्गांनी मारलं महिषासूराला दहाव्या दिवशी. परंतु तो संपला नाही. त्यानं तद्नंतर जन्म घेतलाय, पुनर्जन्म. त्यानंतर त्यानं शांत राहून अनेक महिषासूरांना जन्माला घातलंय. माराल तरी एक महिषासूर मरेल. आणखी कितीतरी महिषासूर तयार होतील. हाच संदेश देत. तसंच आजचं चित्र दिसत आहे. आजची महिला ही अंतराळात गेली. ती पंतप्रधान बनली. राष्ट्रपती बनली. परंतु सक्षम झाली का? नाही. दोनचार महिला सुधरल्यानं व त्यांचा विकास झाल्यानं त्यांचा विकास झाला असा त्याचा अर्थ होत नाही. बऱ्याचशा महिला या अशाही आहेत की ज्या उच्च शिक्षण शिकतात. उच्च पदावर जातात. मोठमोठी पदं भुषवतात. परंतु तरीही स्वतःचे निर्णय स्वतः घेवू शकत नाहीत. त्या आपल्या घरात आपल्या पतीच्याच विचारावर अवलंबून असतात. त्यांच्या निर्णयापलिकडे जात नाहीत. त्यांच्याच मतानं चालतात, वागतात. तसंच त्या आपलं अस्तित्वही विसरतात की मीही सक्षम आहे.

मीच दुर्गा, जंगदंबा, काली, शैलपुत्री व चंद्रघंटा आहे. जर तिनं आपण सक्षम आहो, असं मानून घरात व्यवहार करण्याचा प्रयत्न केला तर तिला घरातून हाकलून लावलं जातं. कारण तिथं तिचा पती रुपातील स्वतःला परमेश्वर मानणारा महिषासूर घरी लपलेला असतो. जर त्या महिलेनं पत्नी समजून आपलं दुर्गारुप घरात दाखविण्याचा प्रयत्न केला की हा आजच्या काळातील महिषासूर तिचं चालूच देत नाही. कारण आजच्या काळातील महिषासूर हा सुधारीत आहे व कालच्या काळातील महिषासूरापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात बुद्धी व ताकत त्यांच्यात आज आलेली आहे. काल दहाव्या दिवशी मरण पावलेल्या महिषासूराने त्यापासून बोध घेतलेला आहे व तो आता नव्या रुपानं पुनर्जन्म घेवून अवतरलेला आहे. कधीही न मरण्यासाठी. अमर होवून आलेला आहे तो. आपल्या वंशजांच्या रुपात. म्हणतोय की तुम्ही कितीही देव्या बना. मी आपला करिश्मा दाखविणारच.एक पुरुष हा जगाचा आधारस्तंभ आणि एक महिला ही सृष्टीची आधारस्तंभ. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. कारण महिला आहे म्हणूनच सृष्टी आणि हे जगही आहे.

नुकतीच नवरात्र महोत्सवाला सुरुवात झालेली आहे व या नवरात्र महोत्सवात स्त्रियांना देवीच्या रुपात अतिशय मानाचं स्थान आहे. या काळात महिलांना एका कन्येरुपात पुजलं जात असून आम्ही महिलांविषयी किती जागरुक आहोत, याचाही परीचय दिला जात आहे.महिला ही सृष्टीची आधारस्तंभच. कारण तीच ज्या बाळाला जन्म देते. त्याचं संगोपन करुन त्याला लहानाचा मोठा करते. अन् असं करीत असतांना ती कधीच कँटाळा करीत नाही. मग त्या बाळाला कडेवर घेणं असो. त्या बाळाचा अभ्यास घेणं असो वा इतर सर्व प्रकारच्या बाळाविषयक जबाबदाऱ्या. ती कधीच अशा जबाबदाऱ्या टाळत नाही. जे बाळ मोठं झालं की तेच बाळ नवनवीन शोध लावतं व सृष्टीत आपल्या ज्ञानानं भर टाकत असतं. ज्यामुळं महिलेला सृष्टीचा आधारस्तंभही म्हटलेलं आहे. जे काम एक महिला करते. तेच काम एक पुरुष करीत नाही. बाहेर नोकरी करायला जाणारी महिला, घरी आल्यावरही घरातील बरीचशी कामं करते. तेवढी कामं एक पुरुष करीत नाही. एका महिलेनं जन्माला घातलेलं तिचं अपत्य सृष्टी रक्षणाचं कामंही करतं नव्हे तर तिही सृष्टी रक्षणाचं काम करीत होती. हे शिकवतो आपल्याला आपला इतिहास. देव्या त्या काळात होत्या की नव्हत्या. हे काही माहित नाही. परंतु जो नवरात्र उत्सव आज साजरा केल्या जातो. त्यावरुन कळतं की जसा पुरुष त्या काळात सक्षम होता. त्यापेक्षा कितीतरी प्रमाणात महिलाही सक्षम होत्या. जो नवरात्र उत्सव दरवर्षी येवून महिलांना संदेश देत असतो की महिलांनो तुम्ही सक्षम बना.

महिला आज सक्षम आहे काय? असा प्रश्न उपस्थीत केल्यास त्याचं उत्तर मिळतं, नाही. आजही महिला सक्षम नाही. जरी त्या महिलेत कालची दुर्गा, काली, शैलपुत्री, चंद्रघंटा, जगदंबा संचारत असेल तरी. तरी ती आजच्या काळातील महिषासूराची महिषासूर मर्दिनी बनून शिकार करीत नाही.महिषासूर...काल एकच महिषासूर होता जगात. जो महिषासूर सृष्टीवर राज करायचा. जो महिषासूर महिलांना छळायचा. जो महिषासूर महिलांच्या इज्जतीवर हात घालायचा. तेच पाहिलं सर्वांनी व त्याचं दमन करण्यासाठी कितीतरी महिला एकत्र झाल्या व त्यांनी एकत्र येवून त्या काळातील एका महिषासूराचं दमन केलं, दुर्गा नावाचा अवतार घेवून. हेच नवरात्र महोत्सव शिकवतं व आठवण करुन देतं, दरवर्षी की तुम्हीही असंच करावं. आजच्या काळात कोणालाही महिषासूर बनू देवू नका. परंतु हे जरी खरं असलं तरी आजच्या काळात महिषासूर नाहीत का?

महिषासूराबद्दल आज विचार करीत असतांना आजच्या काळातही महिषासूर भरपूर आहेत व आजच्या काळात असे महिषासूर भरपूर आहेत. जे महिषासूर महिलेला एकटं बघतात व तिच्यावर अतिप्रसंग करण्याचे प्रसंग करतात. तिचे चेहरे अप्रूप, विद्रूप करुन प्रसंगी तिला जाळूनही टाकतात. आजचे महिषासूर घरातही आहेत की जे आपल्याच घरातील दुर्गास्वरुप लक्ष्मीला हुंड्यासाठी छळतात व तिलाही जाळून टाकतात. कधी विष देतात तर कधी फासावर लटकावून तिनंच फाशी घेतलेली आहे. असा बनाव करतात. एवढंच नाही तर अशा महिषासूराला शिक्षा न देता त्याला मदत करणारी न्यायव्यवस्था पुरावे व्यवस्थित न तपासता पटकन जमानत देते. ज्यातून आजच्या काळातील महिषासूराची शक्ती वाढते. ज्या न्यायालयाच्या जमानत नावाच्या शक्तीनं त्याला एवढं बळ मिळतं की तो नव दिवसच नाही तर बरेच दिवस जीवंत राहतो, कधीही मरत नसल्यासारखं गृहित धरुन.

आजचे महिषासूर तर नवरात्रदरम्यानच्या उत्सवातही हजर असतात. नवरात्र उत्सवादरम्यान गरबा खेळायला येणाऱ्या व सजून धजून येणाऱ्या सुंदर सुंदर मुलींना आपल्या जाळ्यात ओढतात. प्रेमाचं नाटक करुन प्रेमजाळं फेक्तात व सहज अशा कोवळ्या कौमार्य अवस्थेतील मुलींना प्रेमजाळ्यानं नवरात्र महोत्सवातूनच आकर्षीत करुन ओढून घेतात. मग काय, अशा मुली प्रेमजाळ्यात फसल्या की बस, आयुष्य बरबाद. शिक्षणात मन लागत नाही. सारखी त्यानंतर महिषासूराचीच आठवण. परंतु हे महिषासूर अशा मुलींशी विवाहबद्ध होत नाहीत. ते फक्त आपली हवस पुर्ण करतात व हवस पुर्ण झाली की सोडून देतात. त्यानंतर अशा मुलींना आजच्या महिषासूरानं सोडल्यावर त्या गरोदर राहतात. दिवस जास्त झालेले असतात आणि महिषासूराचा पत्ता नसतो. शेवटी गर्भधारणेला जास्त दिवस झाले की भ्रृणहत्या करता येत नाही. मग नाजायज बाळ जन्माला घालावं लागतं व बदनामी नको म्हणून बाळ रस्त्यावर फेक्लं जातं. ज्या आपल्या पोटातून काढलेल्या बाळाला जीवंत असतांना कुत्रं खावो की आणखी कोणी. याचा विचारच केल्या जात नाही. मात्र महिषासूर सुटतो, पुढील वाईट कर्म करण्यासाठी.

विशेष म्हणजे आजच्या काळातील महिलांनी नवरात्रोत्सव साजरा करतांना हीच गोष्ट लक्षात घ्यावी. नवरात्रोत्सवापासून संदेश घ्यावा व नवरात्रोत्सव नक्कीच साजरा करावा. सजावं, धजावं. गरबा खेळावा. परंतु कोणाच्या प्रेमजाळात अडकू नये. प्रेमभावनेच्या गोड गोड बोलण्यात अडकू नये. त्या प्रेमाच्या गोंडस पडद्यात लपलेल्या महिषासूराला ओळखावे. शिवाय नवरात्र संपल्यावरही महिषासूर संपले. असं गृहित धरु नये. ते असतातच आजुबाजूला, आपण वावरत असतांना. अशावेळेस त्यांचा प्रतिकार करण्यासाठी चौकस बुद्धी ठेवावी आपल्याजवळ. तिखटाची एखादी पुड ठेवावी आपल्याजवळ. नाहीच असली तर धुळ घ्यावी. तिलाच शस्त्र बनवावं. कारण माती ही देखील महत्त्वपूर्णच आहे. तिच्यापासून दुर्गेची मुर्ती बनते. कधी आजुबाजूच्या दगडांना शस्त्र बनवावं. अन् तेही नसेल तर हाता पायालाच शस्त्र बनवून त्यानं प्रतिकार करावा. जेणेकरुन आजच्या काळातील हे मोकाट सुटलेले व लावारीस झालेले, अत्याचार, अन्याय करु पाहणारे महिषासूर संपतील. यात शंका नाही. एवढाच संदेश नवरात्रोत्सवाच्या निमित्याने देणे आहे.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर

# दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांना मदतीसाठी पं.स.च्या शिक्षण विभागाचा सामाजिक पुढाकार

## नवरात्रोत्सवात माहूरमध्ये ‘बळीराजा आधार-एक हात’ मदतीचा उपक्रम

माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूरगड येथे नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर टी-पॉइंट परिसरात बळीराजा आधार अभियान या प्रकल्पांतर्गत ‘बळीराजा आधार-एक हात’ मदतीचा हा अनोखा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. पंचायत समिती माहूरच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित या उपक्रमातून दुष्काळाच्या संकटाचा सामना करणाऱ्या शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देण्याचा आणि समाजात सामाजिक बांधिलकीची जाणीव जागृत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

उपक्रमशील गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. नवरात्रोत्सवासाठी श्रीक्षेत्र माहूरगड येथे येणाऱ्या भाविकांच्या उपस्थितीत बळीराजाप्रती संवेदनशीलता, सहकार्य आणि माणुसकीचा संदेश देण्यात येत आहे. शेतकरी हा समाजाचा अन्नदाता असून, नैसर्गिक संकटामुळे त्याच्यावर ओढवलेल्या कठीण परिस्थितीत त्याला आधार देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. याच भावनेतून शिक्षण विभागाने हा सामाजिक उपक्रम हाती घेतला असल्याची माहिती गट शिक्षण अधिकारी संतोष शेटकर यांनी दिली.या उपक्रमाला माहूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तालुक्यातील चारही शिक्षक संघटना या




सामाजिक अभियानात सहभागी झाल्या असून, दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांसाठी निधी संकलन करण्यासाठी शिक्षक सरसावले आहेत. शिक्षकांच्या या पुढाकारातून केवळ शैक्षणिक जबाबदारीच नव्हे, तर सामाजिक दायित्वाची जाणीवही अधोरेखित होत आहे.या अभियानांतर्गत संकलित करण्यात येणाऱ्या निधीतून माहूर तालुक्यातील गरजू कुटुंबांना अन्नधान्य वितरित करण्यात येणार आहे. संकटाच्या काळात गरजूंच्या पाठीशी उभे राहून त्यांना दिलासा देण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. नवरात्रोत्सवाच्या भक्तिमय वातावरणात राबविण्यात येणारा हा उपक्रम सामाजिक एकोपा, सहकार्य आणि माणुसकीची शिकवण देणारा ठरत आहे. बळीराजाला आधार देण्यासाठी शिक्षण विभागाणे घेतलेला हा पुढाकार समाजासाठी प्रेरणादायी ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.आज सोमवारी या अभिनव उपक्रमाची गडावर जाणाऱ्या रस्त्यावर मंडप टाकून निधी संकलणाला सुरवात झाली. या वेळी एस एस पाटील,संतोष चव्हाण,बालाजी येरमे,आशिष माहुरे, अनिल सुरोशे,अरविंद जाधव,रा.च. चारोळे,डॉ अरुण धकाते, दिगंबर जगताप, काशिनाथ थोंटे यांची उपस्थिती होती.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# लवकरच कांद्याचे दर घटणार

मुंबई/प्रतिनिधी-कांद्याच्या वाढत्या किमतींमुळे त्रस्त असलेल्या ग्राहकांना येत्या काही आठवड्यांत दिलासा मिळण्याची शक्यता आहे. खरीप हंगामातील कांद्याची महाराष्ट्र, कर्नाटकसह अन्य उत्पादक राज्यांतून आवक वाढली आहे. शिवाय किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने बफर साठ्यातून कांद्याची विक्रीही वाढवली आहे. परिणामी, सणासुदीच्या तोंडावर कांद्याचे भाव कमी होण्याची शक्यता आहे.

सध्या कांद्याचा सरासरी किरकोळ भाव ५२.९९ रुपये प्रति किलो होता. तो गेल्या वर्षीच्या तुलनेत जवळपास दुप्पट आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, १० सप्टेंबरच्या सुमारास कांद्याचा सरासरी किरकोळ भाव ५३.१० रुपये प्रति किलो होता, जो १० ऑक्टोबर रोजी किंचित कमी होऊन ५२.९९ रुपये प्रति किलो झाला. घाऊक बाजारात पुरवठा सुधारल्याची चिन्हे दिसत असूनही, त्याचा फायदा बाजारातील ग्राहकांपर्यंत मर्यादित किरकोळ प्रमाणातच पोहोचला आहे. कांद्याचा सरासरी घाऊक भाव ४५९१ प्रति क्विंटल होता. हा भाव महिन्याभरापूर्वीच्या तुलनेत २.४ टक्क्यांनी आणि वर्षभरापूर्वीच्या तुलनेत १२३.३ टक्क्यांनी जास्त आहे.

# निराधार महिलेला पुन्हा मिळाला कुटुंबाचा आधार

## डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयाच्या पाठपुराव्याला यश;महिलेची सुखरुप घरवापसी



नांदेड/प्रतिनिधी-घरापासून दूर भरकटलेल्या सुशिला सायबू मैलारे (वय ५० वर्षे) यांना डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथील समाजसेवा विभागाच्या प्रयत्नांमुळे पुन्हा कुटुंबाचा आधार मिळाला. आठ ते दहा दिवसांच्या पाठपुराव्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांचा शोध घेण्यात यश आले. आवश्यक वैद्यकीय उपचारांनंतर दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांना नातेवाईकांसमवेत सुखरूप घरी पाठविण्यात आले.

सुशिला मैलारे यांना दि. ३० सप्टेंबर रोजी नांदेड रेल्वेस्थानकाच्या वाहनतळ परिसरातून १०८ रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. औषध वैद्यकशास्त्र विभागातील कक्ष क्रमांक ३१ येथे त्यांच्यावर उपचार सुरू असताना समाजसेवा विभागाने त्यांचे समुपदेशन केले. तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपचारांनंतर त्यांनी स्वतःचे नाव, पत्ता आणि कुटुंबीयांविषयी माहिती दिली. त्यानुसार त्यांचे मूळ गाव डौर, ता. बिलोली, जि. नांदेड असल्याचे समोर आले. स्थानिक नागरिकांच्या मदतीने माहितीची पडताळणी केल्यानंतर त्यांचे कुटुंब रोजगारासाठी निजामाबाद जिल्ह्यातील नंदीपेठ येथे स्थलांतरित झाल्याचे समजले. त्यानंतर समाजसेवा विभागाने त्यांच्या मुला-मुलींशी संपर्क साधून आई रुग्णालयात दाखल असल्याची माहिती दिली. गणेशोत्सवा दरम्यान रोजगारासाठी हैदराबाद येथे गेले असताना आई घरातून बाहेर पडल्याचे त्यांच्या मुलीने सांगितले. अखेर कुटुंबीय रुग्णालयात दाखल झाल्यानंतर आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून सुशिला मैलारे यांना घरी पाठविण्यात आले. या कार्यासाठी डॉ. विजयकुमार कापसे, डॉ. शीतल राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) संतोष मुंगल यांनी कुटुंबीयांचा शोध घेण्यासाठी समन्वय साधत सातत्याने पाठपुरावा केला.



रविवारपासून नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला असून शहरातील हनुमान पेठ येथील आंबा माता मंदिरात मातेचे दर्शन घेण्यासाठी परिसरातील भाविक मोठ्या प्रमाणात येत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# सर्व शासकीय सेवा शंभर टक्के ऑनलाइन करुन प्रशासन अधिक पारदर्शक करा-डॉ.किरण जाधव

नांदेड/प्रतिनिधी-कार्यक्षम, पारदर्शक आणि गतिमान प्रशासनासाठी सर्व शासकीय सेवा शंभर टक्के ऑनलाइन कराव्यात. ऑनलाइन सेवांमुळे कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे सुलभ होते. नागरिकांना पारदर्शक सेवा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे, असे निर्देश छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिले.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, उपजिल्हाधिकारी अजय शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.नागरिकांना अधिसूचित शासकीय सेवांचा लाभ विहित कालमर्यादेत मिळणे आवश्यक आहे. या दृष्टीने नांदेड जिल्ह्याचे काम चांगले असून, जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले. जानेवारी ते डिसेंबर २०२६ या कालावधीतील उत्कृष्ट आपले सरकार सेवा केंद्र, उत्कृष्ट ग्रामपंचायतस्तरीय आपले सरकार सेवा केंद्र आणि महानगरपालिकेच्या उत्कृष्ट सेवा केंद्रांना विभागीय व राज्यस्तरावर पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. या पुरस्कारांसाठी सर्व संबंधित विभागांनी उत्कृष्ट कामगिरी करावी, असेही त्यांनी सांगितले.लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्राप्त अर्ज प्रलंबित राहणार नाहीत, यासाठी विभागप्रमुखांनी नियमित आढावा घेऊन पाठपुरावा करावा. विहित कालावधीत सेवा न मिळाल्याने प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाखल झालेली प्रकरणे सुनावणी घेऊन वेळेत निकाली काढण्याचे निर्देश डॉ. जाधव यांनी दिले.

# विद्यापीठात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती व 'वाचन प्रेरणा दिन' कार्यक्रम



नांदेड/प्रतिनिधी-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ज्ञान स्रोत केंद्रात भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती आणि 'वाचन प्रेरणा दिन' समारंभाचे आयोजन गुरुवार, दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:४० वाजता करण्यात आले आहे. या निमित्ताने विद्यापीठात ग्रंथप्रदर्शन, उत्कृष्ट वाचक पुरस्कार वितरण आणि विशेष विद्वत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर असणार आहेत. तर प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन आणि नांदेड उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. बाबासाहेब भोसले यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.या सोहळ्यात नांदेड येथील इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे हे पुस्तकाकडून अर्थाकडे या विषयावर प्रमुख व्याख्याते म्हणून आपले विचार मांडणार आहेत.हा सोहळा विद्यापीठातील ज्ञान स्रोत केंद्राच्या कक्ष क्र. १०६ मध्ये पार पडणार आहे. या प्रसंगी विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा व विद्या परिषद सदस्य, ज्ञान स्रोत समिती सदस्य, संवैधानिक अधिकारी, संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास कर्मचारी, संशोधक विद्यार्थी व वाचनप्रेमी व्यक्तींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पवार आणि ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. जगदीश नरहरराव कुलकर्णी यांनी केले आहे.

# पाण्याचा काटकसरीने वापर करा-नगराध्यक्षा तेजश्री जैन

उमरखेड/प्रतिनिधी-यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने निर्माण झालेल्या दुष्काळजन्य परिस्थितीवर मात करण्यासाठी शहरवासीयांनी पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करून नगर प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा सौ. तेजश्री संतोष जैन यांनी केले आहे.



नगर परिषदेकडून होणारा दैनंदिन पाणीपुरवठा नागरिकांनी जपून वापरावा. गृहिणींनी घरगुती सांडपाण्याचे योग्य व्यवस्थापन करून पाण्याची बचत करावी. तसेच नळधारकांनी पाणी आल्यानंतर व्यर्थ जाऊ नये म्हणून नळांना तोट्या लावणे अत्यंत गरजेचे आहे. ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे त्या म्हणाल्या.पुढील काळात पाण्याची परिस्थिती कशी राहील हे आताच सांगता येणार नसले तरी, सध्याच्या परिस्थितीत शहरवासियांना पाण्याची टंचाई भासू देणार नाही, असेही नगराध्यक्षा जैन यांनी स्पष्ट केले.



राष्ट्रवादी युवक काँग्रेसची आढावा बैठक निर्वाचित प्रदेशाध्यक्ष निखील ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉटेल मिंट येथे संपन्न झाली. या बैठकीला आ.प्रताप पाटील चिखलीकर, माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, माधव पावडे, शिवराज पाटील होटाळकर, कन्हैय्या कदम, स्वप्नील पाटील इंगळे, बालाजी पाटील शिंदे व इतर उपस्थित होते.

# भाजपा देगलूर शहर महिला उपाध्यक्षपदी ॲड.पल्लवी डावखरे



देगलूर/प्रतिनिधी- भाजपा देगलूर शहर महिला उपाध्यक्षपदी ॲड.पल्लवी केशवराव डावखरे (कळसकर) यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश सचिव तथा नांदेड जिल्हा प्रभारी सौ. सुरेखाताई कुलकर्णी व देगलूर मंडळ महिला अध्यक्षा भावना दाशेटवार यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षश्रेष्ठींच्या सूचनेनुसार पदाचे अधिकृत नियुक्तीपत्र देऊन ॲड.पल्लवी डावखरे यांना पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे आणि महिलांच्या प्रश्नांना वाचा फोडणे यासाठी तळमळीने कार्य करण्याचा संकल्प याप्रसंगी ॲड. पल्लवी डावखरे (कळसकर) यांनी व्यक्त केला. या निवडीबद्दल देगलूर शहर अध्यक्ष प्रशांत दासरवार ॲड.अवधूत प्रकाश राजकुंटवार भारतीय जनता पार्टीचे सर्व वरिष्ठ पदाधिकारी, देगलूर वकील संघ, मित्रपरिवार, विविध सामाजिक संघटना व नागरिकांकडून ॲड. पल्लवी डावखरे (कळसकर) मॅडम यांच्यावर शुभेच्छांचा मोठा वर्षाव होत आहे.

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १५२२/२०२६
अर्चना व ईतर वि. निरंक
ने. ता. २६/११/२०२६

अर्जदार:- १. अर्चना भ्र.अरुण जोशी, वय : ४७ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.गिरीराज हाउसींग सोसायटी, एम.आय.डी.सी. वाळुज, पंढरपुर, वळदगाव, औरंगाबाद, २. चंचल भ्र.दिलीप पवार, वय : ४४ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.बिडकीनगाव ता.जि.औरंगाबाद, ३. सारीका उर्फ प्रिती भ्र.गोविंद शर्मा, वय : ५१ वर्षे, व्यवसाय : घरकाम, रा.पैठण रोड, विटखेडा, ता.जि.औरंगाबाद, ४, निकिता भ्र. नंदकिशोर दाड, वय : ४८ वर्षे, व्यवसाय : मजुरी रा.भारत नगर, पैठण, औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत उत्तमचंद पि.शिवकिरण व्यास यांचा मृत्यु दिनांक २१/०६/२०१६ रोजी निसरपूर कोठडा मध्यप्रदेश येथे झाला आहे. अर्जदार क्र.१ ते ४ ह्या मयताच्या विवाहीत मुली आहेत. सदरच्या अर्जात अर्जदार हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक २६/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# जिल्ह्यात नवरात्रौत्सवात २,५५५ दुर्गा मूर्तींची स्थापना

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यात अत्यंत शांततेत, सुरक्षित वातावरणात आणि उत्साहात नवरात्रौत्सव साजरा व्हावा, यासाठी पोलीस प्रशासनाने चोख व व्यापक सुरक्षा नियोजन केले आहे. नांदेड शहर व संपूर्ण जिल्ह्यात ११ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवात अत्यंत भक्तीमय, मंगलमय आणि शांततापूर्ण वातावरणात प्रारंभ झाला आहे. घटस्थापनेच्या पहिल्या दिवशी संपूर्ण जिल्हाभरात शहरी व ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणावर दुर्गादेवी, शारदादेवी आणि घटस्थापना करण्यात आली आहे. स्थापनेचा तपशील दुर्गादेवी स्थापना : (शहरी-८३२, ग्रामिण-१६८४) एकूण २५१६, शारदादेवी स्थापना : (शहरी-१०, ग्रामिण-२७) एकुण ३७, एकुण घटस्थापना : २ अशाप्रकारे जिल्ह्यात एकूण २,५५५ ठिकाणी मूर्ती व घटस्थापना करण्यात आली आहे.

# माजी सरपंच विपिन सोनटक्के यांचे निधन

धर्माबाद/प्रतिनिधी-इंदिरानगर धर्माबाद येथील रहिवासी आणि माजी सरपंच विपिन ग्यानोबा सोनटक्के शेळगावकर (वय ४०) यांचे सोमवार दि.१२ ऑक्टोबर रोजी दुपारी आकस्मिक निधन झाले.



त्यांच्या पार्थिवावर मंगळवार, १३ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. माजी सरपंच म्हणून त्यांनी केलेले सामाजिक कार्य आणि त्यांचा मनमिळावू स्वभाव नेहमीच स्मरणात राहील. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे.

CHANGE IN NAME

My old name is **Puja Arvind Agrawal** which now I am changing as new name **Puja Mayur Agrawal**

Henceforth, my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

Address:
Opposite Marwadi Dharamshala
Vazirabad, Nanded – 431601.
Mobile No.: 7798099123

CHANGE IN NAME

My mother's (old name) is **RAZIA BEE** which now she is changing as (new name) **RAJIYA BEGUM ABDUL KARIM**

Henceforth, her correspondance will be done as per my new name. please consider the same.

Signature
**RAJIYA BEGUM ABDUL KARIM**
Address:
67-1, Dargah Pura, Kandhar,
Near Badi Dargah, Kandhar,
Dist: Nanded, Maharashtra-431714
Mobile No : 8888466347

CHANGE IN NAME

My (old name) is **IMRAN KHAN PATHAN** which now I am changing as (new name) **IMRAN KHAN ABDUL KARIM PATHAN**

Henceforth, my correspondance will be done as per my new name. please consider the same.

Signature
**IMRAN KHAN ABDUL KARIM PATHAN**
Address:
67-1, Dargah Pura, Kandhar,
Near Badi Dargah, Kandhar,
Dist: Nanded, Maharashtra-431714
Mobile No : 8888466347

# बोधडी ग्रामपंचायतीची तिन्ही बँक खाती गोठवली

# ४८ तासांच्या अल्टीमेटमनंतरही मूळ अभिलेखे गायब

किनवट/प्रतिनिधी- बोधडी बु. ग्रामपंचायतीच्या ग्राम विकास अधिकाऱ्यांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या ८ ऑक्टोबर रोजीच्या ४८ तासाच्या अल्टिमेटमच्या नोटीसीलाही १३ ऑक्टोबर पर्यंत केराची टोपली दाखवित मूळ अभिलेखे सादर केले नाही.

ग्रामविकासाच्या निधीत कथित अनियमितता झाल्याच्या आरोपानंतर चौकशी दरम्यान ग्राम पंचायत अधिकाऱ्यांनी मारलेल्या दांडीमुळे गुंतागुंत वाढली आहे. वरिष्ठ प्रशासनाला चौकशीकामी अपेक्षित सहयोग न मिळाल्याने गटविकास अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीची तिन्ही बँक खाती गोठविण्याचे निर्देश दिले आहेत.

बोधडी बु. ग्रामपंचायतीला विविध विकास योजनांतून प्राप्त झालेला निधी मंजूर आराखड्यानुसार खर्च न करता परस्पर आणि अनधिकृतरीत्या वळविण्यात आल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. चार वर्षांच्या कालखंडातील आर्थिक व्यवहारांची निष्पक्ष तपासणी झाल्यास निधीच्या वापरातील अनियमितता स्पष्ट होऊ शकते, असे तक्रारदारांचे म्हणणे आहे. तक्रारीच्या पार्श्वभूमीवर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी १२ ऑक्टोबर रोजी स्टेट बँक ऑफ इंडिया, किनवट शाखा; आयसीआयसीआय बँक, नांदेड शाखा आणि महाराष्ट्र ग्रामीण बँक, बोधडी बुद्रुक शाखा या तीन बँकांच्या व्यवस्थापकांना ग्रामपंचायतीच्या खात्यांबाबत निर्देश देण्यात आले आहेत. या निर्देशांनुसार, तिन्ही खात्यांचे सविस्तर विवरणपत्र तातडीने सादर करणे, खाती होल्ड ठेवणे आणि गटविकास अधिकाऱ्यांचे साक्षांकित उचल परवानगी प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही धनादेशाची अथवा अन्य आर्थिक व्यवहाराची परवानगी न देणे, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. या निर्णयामुळे ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण आले असून, निधीच्या प्रत्यक्ष विनियोगाची पडताळणी करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्बंधांचा कालावधी आणि त्यानंतरची कार्यवाही याबाबत पुढील अधिकृत निर्देश महत्त्वाचे ठरणार आहेत.

प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेऊन विस्तार अधिकारी (पंचायत) वाय. एच. गायकवाड यांची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामपंचायत कार्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन तक्रारीतील प्रत्येक मुद्द्याची तपासणी करणे, संबंधित अभिलेख व आर्थिक व्यवहारांची पडताळणी करणे आणि स्पष्ट अभिप्रायासह चौकशी अहवाल दोन प्रतींत तातडीने सादर करण्याचे आदेश त्यांना देण्यात आले आहेत. आता या तपासात मंजूर विकासकामे, प्रत्यक्ष खर्च, बँक खात्यांतील जमा-खर्च, धनादेश आणि संबंधित कागदपत्रांची सुसंगतता तपासली जाणार का, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.खात्यांना टाळे लागले; पण कथित गैरव्यवहाराचे सत्य चौकशीतून उघड होणार कधी ?, हा प्रश्न सध्या बोधडी बुद्रुकमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. खाती गोठविणे हा तपासातील महत्त्वाचा टप्पा असला, तरी केवळ निर्बंधांवर प्रकरण थांबता कामा नये. चौकशी निष्पक्षपणे पूर्ण करून आर्थिक अनियमितता आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करणे, तसेच निधीच्या वापराबाबत पारदर्शक माहिती ग्रामस्थांसमोर आणणे, हीच आता गटविकास अधिकाऱ्यांची खरी कसोटी ठरणार आहे. चौकशीचे गुऱ्हाळ लावून प्रकरण थंड बस्त्यात फेकण्याची शक्यता लक्षात घेता जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रारदार दाद मागणार असल्याचे सांगण्यात आले.

## नौदलाच्या ताफ्यात मंगरोल युद्धनौका दाखल

नवी दिल्ली:भारतीय नौदलाच्या ताफ्यात उथळ समुद्रातील पाणबुड्यांचा शोध घेऊन त्यांचा मुकाबला करण्यासाठी सज्ज असलेली मंगरोल ही तिसरी पाणबुडीविरोधी युद्धनौका सोमवारी दाखल झाली. या युद्धनौकेमुळे विशेषतः किनारी भाग, बंदरे आणि सागरी मार्गाच्या सुरक्षेसाठी नौदलाची क्षमता वाढणार आहे. कोची येथील कोचीन लिमिटेड ने (सीएसएल) या शिपयार्ड युद्धनौकेची निर्मिती केली आहे. पश्चिम नौदल कमांडचे फ्लॅग ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ व्हाइस ॲडमिरल संजय वत्सायन या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## कंधार तालुक्यात फायनान्स कंपन्यांची कर्जवसुली तात्काळ थांबवावी

### ठाकरे सेनेची मागणी

कंधार/प्रतिनिधी-कंधार तालुक्यासह मराठवाड्यात निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी विविध फायनान्स कंपन्यांकडून सुरू असलेली कर्जवसुली तात्काळ थांबवावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तहसिलदार कंधार यांना दि.१३ रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मागील वर्षी अतिवृष्टी, तर यंदा पावसाअभावी निर्माण झालेल्या कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी आणि शेतमजूर आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतीतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसल्याने अनेक कुटुंबांसमोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत शासनाने कर्जवसुली थांबविण्याच्या सूचना दिलेल्या असतानाही फायनान्स कंपन्यांकडून कर्जाच्या हप्त्यांसाठी तगादा लावला जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. आर.बी.आय.अंतर्गत येणाऱ्या विविध फायनान्स कंपन्या तसेच गृहकर्ज, वाहनकर्ज, व्यावसायिक कर्ज आणि वैयक्तिक कर्ज देणाऱ्या संस्थांकडून वसुली सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित कंपन्यांचे कर्मचारी व एजंट कर्जदारांच्या घरी जाऊन हप्ते भरण्यासाठी दबाव आणत असल्याचेही सांगण्यात आले आहे. हप्ते वेळेवर भरले नाहीत तर सिबिल स्कोअर खराब करण्याची तसेच न्यायालयात खेचण्याची धमकी दिली जात असल्याने आर्थिक संकटातील नागरिकांवरील मानसिक ताण वाढत आहे. या दबावामुळे कर्जदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असून, काहींना गंभीर मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची चिंता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. निवेदनावर तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, तालुका संघटक पंडित देवकांबळे, उपतालुकाप्रमुख विजय पवार, उपशहरप्रमुख निलेश मोरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



नांदेड एज्युकेशन सोसायटी संचलित पीपल्स प्राथमिक शाळेतील १ ली ते ४ थ्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत प्रावीण्य प्राप्त केले त्या विद्यार्थ्यांना शालेय समितीचे अध्यक्ष स. नौनिहालसिंघ जहागीरदार, पत्रकार क्षेमंकर कुलकर्णी, शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत चौधरी सर, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका कु.सोनाली केंद्रे मॅडम यांच्या हस्ते बक्षीस वाटप करुन प्रोत्साहन देण्यात आले.

## तेलंगणातील पोलीस पतीकडून पत्नीचा छळ;सात जणांविरुद्ध गुन्हा

देगलूर प्रतिनिधी-तेलंगणा राज्यातील पोलीस दलात कार्यरत असलेल्या पतीने बुलेट मोटरसायकल खरेदीसाठी बाहेरून दोन लाख रुपये आणण्याचाच गाडा लावत मानसिक व शारीरिक छळ केल्याची तक्रार देगलूर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. याप्रकरणी पती उमाकांत निरोडे, सासू शांताबाई निरोडे आणि ननंदासह सासरच्या सात जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

देगलूर शहरातील आंबेडकर नगर येथे वास्तव्यास असलेल्या दीक्षा उमाकांत निरोडे वय (२१) यांचा विवाह तेलंगणा राज्यातील जुक्कल येथील उमाकांत निरोडे यांच्याशी झाला होता. लग्नानंतर अवघ्या पंधरा ते वीस दिवसातच पतीकडून त्रास देण्यास सुरुवात झाली. बुलेट मोटरसायकल घेण्यासाठी बाहेरून दोन लाख रुपये आणावेत, अशी मागणी करण्यात आली. या मागणीवरून शिवीगाळ, शारीरिक व मानसिक छळ तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप विवाहितीने तक्रारीत केला आहे. छळामुळे दीक्षा यांना माहेरी आश्रय घ्यावा लागल्याचेही सांगण्यात आली आहे. दीक्षा निरोडे यांच्या तक्रारीवरून पती उमाकांत निरोडे, सासू शांताबाई निरोडे, आणि ननंदासह सासरच्या एकूण सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस जमादार ज्ञानोबा केंद्र हे करीत आहेत.

## देगलूरच्या स्टेडियम परिसरात वृद्धाची विष प्राशन करुन आत्महत्या

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर शहरातील स्टेडियम परिसरात रस्त्याच्या कडेला विष प्राशन केल्याने ६४ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना रविवार दि.१२ ऑक्टोंबर रोजी दुपारनंतर उघडकीस आली.

नरसिंग गंगाराम शिंदे (वय ६४ रा. डोंगळी, मंडळ मदनुर, जि.कामा रेड्डी; सध्या रा. जोशी गल्ली देगलूर) अशी मृत व्यक्तीचे नाव आहे. रविवारी रोजी दुपारी चार वाजण्यापूर्वी देगलूर येथील स्टेडियमच्या बाजूला रस्त्याच्या कडेला नरसिंग शिंदे यांनी कोणते तरी विष प्राशन केले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर जगदीश गणपतराव निवळे (४१, रा. काठेवाडी, सध्या जोशी, गल्ली देगलूर) यांनी देगलूर पोलीस ठाण्यात खबर दिली. माहिती मिळताच देगलूर पोलीस उपनिरीक्षक गोपाळ सूर्यवंशी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी देगलूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू नोंद करण्यात आली आहे. प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी वैभव पडवळ यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास जमादार बालाजी पुरी करत आहेत.

## छ.शिवाजी महाराज चौक परिसरात आंदोलनावर निर्बंध

उमरखेड/प्रतिनिधी-शहरातील मध्यवर्ती असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील भारत पेट्रोल पंप हटविण्याच्या मागणीसाठी विविध संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी आंदोलन व उपोषणाचा मार्ग अवलंबला होता या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी उमरखेड पोलिसांनी मोठा प्रतिबंधात्मक निर्णय घेतला आहे.

पोलिसांनी या परिसरात जमावबंदी आदेश लागू केले असून, हे आदेश ११ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजेपासून ते २२ ऑक्टोबर सकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहणार आहेत. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शिवाजी महाराज चौक परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास मनाई करण्यात आली असून लाठ्या, काठ्या, तलवारी, बंदुका, सुरे किंवा शरीरास इजा पोहोचवू शकतील अशी कोणतीही शस्त्रे बाळगण्यास सक्त मनाई केली आहे.या परिसरात उपोषण, धरणे, आंदोलन, निदर्शने, घोषणाबाजी करणे आणि फलक लावण्यास सुद्धा बंदी घातली असून शांतता व सुव्यवस्थेला बाधा येईल असे कोणतेही कृत्य करण्यास मनाई आहे. शासकीय कर्तव्यावरील पोलीस कर्मचारी, सुरक्षा रक्षक, शववाहिका, पूर्वपरवानगी घेतलेल्या विवाह मिरवणुका आणि प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सूट दिलेल्या व्यक्तींना या आदेशातून वगळण्यात आले आहे.आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## कुंडलवाडीत बतुकमा उत्सव उत्साहात साजरा

कुंडलवाडी/प्रतिनिधी-तेलंगणा राज्याच्या सीमेवर असलेल्या कुंडलवाडी शहरात यंदाही महिलांनी पारंपरिक पद्धतीने बतुकमा (बतकम्मा) उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. तेलंगणा राज्याच्या संस्कृतीशी आणि परंपरेशी घट्ट नाते सांगणारा हा उत्सव शहरातील महिलांसाठी आनंद, एकता आणि सांस्कृतिक जिव्हाळ्याचे प्रतीक ठरला.



या उत्सवानिमित्त शहरातील महिला एकत्र आल्या. पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि दांडियाच्या तालावर ठेका धरत महिलांनी उत्सवाचा आनंद लुटला. उत्सवात महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी महिलांनी एकसारखी पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. त्यामुळे उत्सवाच्या सौंदर्यात आणखी भर पडली. पारंपरिक संस्कृतीचे जतन करण्यासोबतच महिलांमधील एकोपा आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत करणारा हा उत्सव कुंडलवाडी शहरात विशेष आकर्षण ठरला. तेलंगणा राज्याच्या सीमेलगत असलेल्या कुंडलवाडी शहरात विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडविणारा बतुकमा उत्सव दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो. यंदाही महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे उत्सवाला चांगली रंगत आली.

पान १ वरुन

## यूपीआय शुल्काला...

मात्र, या शुल्काची अंतिम व्याप्ती, पात्र व्यवहारांचे निकष आणि अंमलबजावणीची निश्चित तारीख याबाबत अधिकृत स्पष्टता आवश्यक आहे. शुल्कामुळे व्यापाऱ्यांचा व्यवहार खर्च वाढल्यास त्याचा अप्रत्यक्ष परिणाम ग्राहकांवर होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त केली जात आहे. व्यापाऱ्यांना अतिरिक्त खर्च सहन करावा लागल्यास काही वस्तू आणि सेवांच्या किमती वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे यूपीआय शुल्काचा मुद्दा केवळ व्यापाऱ्यांपुरता मर्यादित न राहता सामान्य ग्राहकांसाठीही महत्त्वाचा ठरला आहे. दिवाळी हा बाजारपेठेतील मोठ्या उलाढालीचा काळ असतो. या कालावधीत खरेदी-विक्रीचे व्यवहार वाढत असल्याने व्यापाऱ्यांसाठी डिजिटल पेमेंट व्यवस्था महत्त्वाची ठरते. अशा वेळी शुल्काची अंमलबजावणी पुढे ढकलल्याने व्यापाऱ्यांना सणासुदीतील व्यवहारांवर अतिरिक्त खर्चाचे नियोजन करण्याची तातडीची गरज भासणार नाही.दरम्यान, यूपीआय व्यवहारांवरील शुल्काबाबत अंतिम निर्णय जाहीर झाल्यानंतरच कोणत्या व्यापाऱ्यांना आणि कोणत्या प्रकारच्या व्यवहारांना त्याचा फटका बसणार आहे, हे स्पष्ट होईल. डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देताना व्यापाऱ्यांचा खर्च आणि ग्राहकांवरील संभाव्य परिणाम यांचा समतोल राखण्याचे आव्हान संबंधित यंत्रणांसमोर आहे. त्यामुळे दिवाळीनंतर यूपीआय शुल्काबाबत काय निर्णय होतो, याकडे व्यापारी आणि ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

## निवडणूक आयोगा विरोधात...

नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय काही कागदपत्रे अस्पष्ट, काही पाने गहाळ आणि न्यायालयीन शुल्कात २२० रुपयांची कमतरता असल्याचेही रजिस्ट्रीने निदर्शनास आणले आहे. या याचिकेत भारतीय निवडणूक आयोगासह मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त सुखबीर सिंग संधू व विवेक जोशी यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी विरोधी पक्षांनी ६, ७, ८, ९ आणि १२ ऑक्टोबर रोजी निदर्शने केली. या आंदोलना दरम्यान राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांना पोलिसांनी तीन वेळा ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत आहे. आंदोलनप्रकरणी चार गुन्हे दाखल झाल्याने विरोधक आणि दिल्ली पोलिसांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.एकीकडे रस्त्यावर आंदोलन, दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयात याचिका आणि आता राहुल गांधी यांच्या निवासस्थानी विरोधकांची बैठक, अशा तिहेरी आघाडीवर एसआयआरविरोधातील संघर्ष सुरू आहे. राहुल गांधी यांच्या सर्व आंदोलने एकच या घोषणेमुळे विविध संघटनांना एकत्र आणण्याचे प्रयत्न यशस्वी होणार का, सीजेपी या चर्चेत सहभागी होणार का आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विरोधक पुढील कोणती भूमिका घेणार, याकडे आता देशाचे लक्ष लागले आहे.

## जे.के.जोंधळे यांना पुरस्कार जाहीर

धर्माबाद/प्रतिनिधी- आंबेडकर चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आणि वंचित बहुजन आघाडीचे धर्माबाद तालुका सल्लागार जे. के. जोंधळे यांना या वर्षाचा प्रतिष्ठेचा 'धम्मरत्न समाज गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे.



कुसुम सभागृह, नांदेड येथे होणार गौरव सोहळा माँ जिजाऊ महिला सक्षमीकरण विकास केंद्र (नांदेड) संचलित 'संवेदना संस्था' आणि 'आर्केस्ट्रा आर्टिस्ट असोसिएशन' यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. जे. के. जोंधळे हे गेल्या अनेक वर्षांपासून वंचित, शोषित घटकांच्या हक्कांसाठी आणि आंबेडकरवादी चळवळीत हिरीरीने काम करत आहेत. धर्माबाद तालुक्यासह संपूर्ण नांदेड जिल्ह्यात त्यांचा मोठा जनसंपर्क आहे. हा मानाचा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि विविध सामाजिक संघटनांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे.

## दुष्काळात चारा उपलब्धतेसाठी प्रशासनाची संयुक्त पाहणी

नांदेड/प्रतिनिधी- जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पशुधनासाठी चारा उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी कृषी अवशेष व उसाच्या चोथ्यावर प्रक्रिया करून त्यांचा पशुखाद्य म्हणून प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धन विभागाच्या पथकाने कृष्णूर औद्योगिक वसाहतीतील विविध ठिकाणी संयुक्त पाहणी केली. सोमवार, दि.१२ ऑक्टोबर रोजी करण्यात आलेल्या या पाहणीदरम्यान संबंधित घटकांशी चर्चा करून चारा उपलब्धतेचे नियोजन आणि शासन आदेशांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात आला.

नांदेड जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता वाढविणे, उपलब्ध कृषी अवशेषांचा योग्य वापर करणे आणि पिकांचे अवशेष व उसाच्या चोथ्यावर प्रक्रिया करून त्यांचा चारा म्हणून वापर करण्याच्या शक्यता तपासणे, हा या पाहणीचा प्रमुख उद्देश होता. तसेच चारा व पशुखाद्याच्या वाहतुकीवरील निर्बंध आणि विक्री संदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगानेही संबंधितांशी चर्चा करण्यात आली.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशित केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४